


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : ००६ वा शुक्रवार दि. ३१ जानेवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# धनंजय मुंडे प्रकरणात हस्तक्षेपास नकार...

## अजित पवारांची भूमिकाच अधिकृत, मुख्यमंत्री फडणवीसांची स्पष्टोक्ती.....

वृत्तसंस्था /मुंबई

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत त्यांच्या पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. त्यामुळे त्यांची भूमिकाच अधिकृत आहेफ, असे स्पष्ट करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकप्रकारे या प्रकरणात ते कोणताही हस्तक्षेप करणार नसल्याचेच संकेत गुरुवारी दिले.

मागील दोन दिवसांपासून धनंजय मुंडे यांनी नैतिकतेच्या मुद्द्यावर राजीनामा द्यावा, असा आग्रह विरोधकांनी धरला आहे. अशावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी मात्र ठोस पुराव्याशिवाय मुंडे यांच्यावर कोणतीही कारवाई न करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. दुसरीकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनीही या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास एकप्रकारे नकार दिला आहे. दिल्लीतील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या दिल्लीत आहेत. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. धनंजय मुंडेही दिल्लीत असल्याने त्यांची भेट झाली का, असा प्रश्न फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, ङ्गधनंजय मुंडे त्यांच्या कामानिमित्त, तर मी माझ्या कामानिमित्त दिल्लीत आलो होतो. त्यामुळे आमची भेट झाली नाही. पण सकाळी मंत्रिमंडळ बैठकीत आमची भेट झाली होती. धनंजय मुंडे हे आमच्या मंत्रिमंडळातील मंत्री आहेत, त्यामुळे त्यांना भेटण्याची चोरी नाही. ते मला कधीही भेटू शकतात. तसेच मी त्यांना कधीही भेटू शकतो. कुठल्याही कामासाठी भेटू शकतो.फ त्यांच्या राजीनाम्याबाबत अजित पवारांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. अजित पवारांची भूमिका हीच अधिकृत भूमिका आहे, असेही फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत एक बैठक होते. त्या बैठकीला राज्याचे अर्थमंत्री जात असतात. आपल्या अर्थमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या काय अपेक्षा आहेत, या केंद्रीय अर्थमंत्र्यांना दिल्या आहेत. त्याबाबत चर्चाही झाली आहे, असेही फडणवीस यांनी यावेळी सांगितले.





### लग्नातील भेटीने युती होत नसते

चंद्रकांत पाटील आणि उद्धव ठाकरे यांची एका लग्नसमारंभात भेट झाली. या भेटीनंतर शिवसेना (उबाठा) आणि भाजप एकत्र येणार असल्याची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. त्यावर फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला असता त्यांनी मार्मिक उत्तर दिले. लग्नात भेटणे हे स्वाभाविक आहे. मी तिथे असतो तर माझीही भेट झाली असती. पहिली गोष्ट तर लग्नात भेटल्याने पक्ष जवळ येतात किंवा युती होते इतका भाबडा विचार हा तुमच्यासारख्या ज्येष्ठ पत्रकारांच्या डोक्यात येऊ नये, ही आमची अपेक्षा आहे, असा टोला फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींना लगावला.

# पत्नीच्या हत्येचा बनाव उघड पतीच निघाला खुनी!

## दाभाडी दरोडा प्रकरणाचा धक्कादायक उलगडा...

जनसंचलन/मोताळा





तालुक्यातील दाभाडी येथे घडलेला कथित दरोड्याचा प्रकार प्रत्यक्षात एका हत्येचा बनाव असल्याचे पोलिसांच्या तपासात उघडकीस आले आहे. पत्नीची हत्या करून दरोड्याचा देखावा रचणाऱ्या डॉ. गजानन टेकाडे (वय ४५) या पशुवैद्यकावर बोराखेडी पोलिसांनी २९ जानेवारी रोजी रात्री गुन्हा दाखल करत अटक केली आहे. अनैतिक संबंधातून आरोपीने हा कट रचल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे २० जानेवारी रोजी डॉ. टेकाडे यांच्या घरात दरोडा पडल्याची माहिती समोर आली होती. मात्र, तपासादरम्यान संशयास्पद गोष्टी आढळल्याने पोलिसांनी अधिक चौकशी सुरू केली. डॉक्टरच्या मोबाइलवरील व्हिडिओ आणि संदेशांमधून धक्कादायक माहिती समोर आली. दरोड्याचा बनाव डॉ. टेकाडे यांचे आपल्या पत्नीच्या जवळच्या नातेवाईक असलेल्या युवतीसोबत अनैतिक संबंध होते. त्यामध्ये पत्नी आड येत असल्याने त्याने तिला झोपेच्या गोळ्या देऊन बेशुद्ध केले आणि उशीने गुदमरून हत्या केली. यानंतर पोलिसांना दिशाभूल करण्यासाठी स्वतःही गुंगीच्या गोळ्या घेऊन जखमी असल्याचे भासवले आणि घरात दरोडा पडल्याचा देखावा उभा केला.

### पोलिस तपासात फुटले आरोपीचे बिंग

दरोडा पडल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळावर भेट देऊन तपास सुरू केला होता घटनेनंतर आरोपीने पोलिसांना सहकार्य करण्यास टाळाटाळ केली. मात्र, पोलिसांनी संशयास्पद बाबी ओळखत, वैज्ञानिक आणि तांत्रिक तपासाच्या मदतीने हा दरोड्याचा बनाव फोडून काढला. दागिने घरातच सापडल्याने पोलिसांचा संशय बळावला होता ॲसिडिटीच्या म्हणून दिल्या झोपेच्या गोळ्या गजानन टेकाडे याने १९ जानेवारीच्या रात्री ॲसिडिटीच्या म्हणून झोपेच्या गोळ्या दिल्या त्यानंतर रात्री पत्नीचे तोंड उशीने दाबले पत्नीचा मृत्यू झाल्याची खात्री पटल्यानंतर टेकाडेने घरातील कपाट अस्ताव्यस्त केले, तसेच पत्नीच्या अंगावरील दागिने काढून घेतले ठाणेदार सारंग नवलकर, पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र कपले, मधुकर महाजन, हेकॉ नंदकिशोर धांडे, रामदास गायकवाड, पोकों श्रीकांत चिटवार, प्रविण पडोल, विनोद नरोटे, अमोल खराडे, सुनिल भवटे आदींनी तपासात महत्त्वाची भूमिका बजावली. आरोपी डॉक्टरला अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असून, त्याला ३ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. सदर तपासात पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी, एसडीपीओ सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबी प्रमुख अशोक लांडे व बोराखेडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक सारंग नवलकार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, माधुरी टेकाडे यांचे काही दागिने अद्याप सापडलेले नसून, या गुन्ह्यात आणखी आरोपी असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. पुढील तपास ठाणेदार सारंग नवलकार करीत आहेत.

# पाऊस सखीच्या अंगणातला

## संपादकीय लेख

**ये दाटल्या नभा एक सांग... आज का रेंगाळत आहेस तिच्या दारी? खरं सांग... रिता होऊन तिथं, तिच्या अंगणातील थोडा मृधगंधाचा दरवळ घेऊन येणार आहेस का माझ्यासाठी? आधीच तिचे अंगण आंब्याच्या गर्द मोहराने, बाळकैऱ्यांनी, जाई, मोगऱ्याच्या सुगंधाने दरवळून निघालेले आहे, सोबत सोनचाफ्याला कोण बहर आलाय बघ आणि त्या दरवळाला तुझी गळाभेट म्हणजे मृधगंधाच्या रेशमी गाठीत बांधून तू माझ्यासाठी आज कस्तूरीकुपीच घेऊन येणार तर...**

अरे आहेच माझी सखी तशी गुपितांत लपलेली... संकटात हसलेली, एकांतात रडलेली पण भरभरून जगलेली... आणि मला माहित आहे, ती कधीच हरत नाही कारण ती आहे अंगार कष्टात फुलणारा... सुखात रमणारा आणि आनंदात झूलणारा आणि पदरात असूनही पदर न पेटवणारा... हो आहेच ती तशी... तुला आजून निघू वाटत नाही का तिच्या अंगणातून... मी कधीचा वाट पहातो आहे तू येण्याची... गच्च भरल्या नभासोबत भारलेल्या नयनानी... क्षिणलेल्या मनाने... पण मला खात्री आहे, तू येशील नक्कीच येशील... त्या कस्तुरीकुपीतून, वाऱ्याच्या मंद झुळकी बरोबर झूलणारा गारवा घेऊन... आणि माझ्याही अंगणात आगमनातील, त्याच सरी घोड्यांच्या टापांच्या सुरात मोती पेरीत आणि थुईथुई नाचू लागतील, गाऊ लागतील भान हरपून, फेर धरतील हर्षभराचा वेडावलेला... गारताशांच्या आवाजात. तरुवेलींना त्या पुरतं हालवून सोडतील. आणि गारव्याच्या शिरशिरीने क्षणभर का होईना सुखावेल चैत्राच्या ऊनाने अंगाची लाही लाही झालेली वसुंधरा! झाडांना नुक्तीच पालवी फुटलेली पोपटी पोपटी राघूपाने अनुभवतील पहिला वहिला पाऊस सोबतीला हसत हसत डोलतील वेलींवरील लांबच लांब हिरव्या रंगांनी नटलेले हिरवे तुरे! आणि पानाआड लपून बसतील पाखरे, भीतीने कापरे भरल्यागत, पण थोडाच वेळ! जेव्हा सरींचा जोर ओसरेल तेव्हा तिही दोस्ती करतील आपल्या पंखावर स्थिरावलेल्या मोत्यांशी आणि अलगुजात हरवून जातील इतक्या दिवसांच्या, नाहीच महिन्यांच्या विरहाच्या क्षणांना गंधभारल्या कवेत घेऊन!



आणि हिरव्यागार कैऱ्याआडून गर्द पानातून घुमणारा आमराईतला कोकिळतान साद घालील माझ्या कृषिवलास जोडून ठेवलेल्या बी बिवळ्यांची, तिफणीची सोय करण्यासाठी, ऐनवेळी पेरणीसाठी धावाधाव नको म्हणून! तर नभा तू तसाच ये तुला हवा तसा सोबतीला घेऊन धुंदभारला गंध आणि अंकुराला जोजवणारा पाऊस घेऊन माझ्या सखीच्या अंगणातला!

लेखिका
सिमा पाटील

# बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीएम योजनेअंतर्गत सहभागी करून घ्या

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे संबंधित विभागाला निर्देश




**जनसंचलन/बुलढाणा**

पीएम कुसुम योजनाचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून जनजागृती करा आणि जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ द्या, असे निर्देश केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज प्रशासनाला दिलेत. बुलढाणा जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक आज ३० जानेवारीला पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात संपन्न झाली. या बैठकीत संबंधित यंत्रणेला केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी निर्देश दिले. यावेळी केंद्रीय युवा कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, आमदार चैनसुख संचेती, श्वेता महाले, मनोज कायदे, सिद्धार्थ खरात तसेच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस अधिक्षक विश्व पानसरे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. बैठकीदरम्यान केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील विविध विषयांवर अधिकाऱ्यांना निर्देशित केले. यामध्ये प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाभियान अर्थात पीएम कुसुम योजना ही केंद्र सरकारची आहे. या योजनेअंतर्गत, शेतकऱ्यांना सौर पंप बसवण्यासाठी अनुदान दिले जातात. या योजनेचा प्रचार प्रसार करुन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी करून घ्यावेत, असे निर्देशीत केले. शिवाय बुलढाणा येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामासंदर्भात आढावा घेतला. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे. तेव्हा जिल्हा परिषदेच्या शाळेत सुद्धा खाजगी शाळाप्रमाणेच शिक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून सीबीएससी पॅटर्न अंगीकृत करावे. जिल्ह्यातील पांदनरस्ते येणाऱ्या मार्च पर्यंत मोकळे करावेत. पिक विम्याचे पैसे उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा होण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजना कराव्यात, आरोग्य विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्याच्या दृष्टिकोनातून उपाय योजना कराव्यात तसेच भालगाव आणि पळशी बुद्रुक येथे नव्याने प्राथमिक केंद्र सुरू करावे, असा ठराव त्यांनी नियोजन समितीच्या बैठकीत मांडला व हा ठराव बैठकीत पारित करण्यात आला.

# श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय येथे वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम राबविण्यात आला




**जनसंचलन/ नांदूरा**

श्री पुंडलिक महाराज महाविद्यालय नांदुरा येथे ग्रंथालय विभागातर्फे वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा शासनाचा कार्यक्रम दिनांक एक जानेवारी ते १५ जानेवारी पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यात ४ जानेवारी रोजी बारा वाजता ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन माननीय प्राचार्य डॉक्टर मानकर मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनीत सर्व विद्यार्थी व तसेच प्राध्यापकांनी भेट दिली दिनांक तीन तारखेला सामूहिक वाचन हा कार्यक्रम घेण्यात आला या सहावी सामूहिक वाचन कार्यक्रमात देखील बरेच विद्यार्थ्यांनी ग्रंथालयात बसून ग्रंथांचे वाचन केले दिनांक सहा तारखेला वाचन कौशल्य कार्यशाळा ग्रंथालय विभागाद्वारे आयोजित करण्यात आले या कार्यशाळेचे प्रमुख अतिथी डॉक्टर गजानन विरकर सर होते व अध्यक्ष माननीय प्राचार्य मानकर मॅडम होत्या या व्याख्यानात विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात विद्यार्थी जीवनात वाचनाचे किती महत्त्व आहे यापासून आपले व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा करता येतो यावर भाष्य केले कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय मानकर मॅडम यांनी देखील विद्यार्थ्यांना डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक जीवनाविषयी माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथालयाच्या ग्रंथपाल प्राध्यापक डॉक्टर प्रतिभा आत्राम यांनी केले व आभार सुनंदाचे मॅडम यांनी केले दिनांक सात तारखेला निबंध स्पर्धेचे व बुक रिव्ह्यू स्पर्धेचे आयोजन करण्यात आले बऱ्याच विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी घेतला व याप्रमाणे वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमा अंतर्गत पंधरवडा साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालय विभाग प्रमुख डॉक्टर प्रतिभा आत्रम यांनी मानविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर मानकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले सर्व सर्व विद्यार्थी व प्राध्यापकांनी या पंधरवाडा कार्यक्रमात सहभाग घेतला

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# बीडमध्ये अजितदादा येताच वातावरण तापले...

## पंकजा आणि धनंजय मुंडेंबद्दल थेट म्हणाले, दोघांना...



**बीड :** अजित पवार हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना अजित पवार हे दिसले. यासोबतच अजित पवार यांनी म्हटले की, अफवांवर विश्वास ठेवू नका. कुणी जबाबदार असेल, कुणी विकास कामात खंडणी मागत असेल मी मकोका लावायला मागेपुढे पाहणार नाही. मला कुणाला टार्गेट करायचं नाही पण बदल झाला पाहिजे. येथील लोकांना कळले पाहिजे की बदल होत आहे. चुकीच्या पध्दतीने काही सुरू असेल तर आळा बसलाच पाहिजे. जे कुणी रिव्हॉल्व्हर हवेत दाखवेल त्याचे लायसन्स रद्द होईल. विशेष म्हणजे यावेळी अजित पवार हे धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्याबद्दल बोलताना देखील दिसले आहेत. अजित पवार हे म्हणाले की, पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांना देखील विश्वासात घेईल. म्हणजेच अजित पवार बीड जिल्ह्याबद्दल जो काही निर्णय घेतील, त्यामध्ये पंकजा आणि धनंजय यांना विश्वासात घेतले जाईल. यावेळी बोलताना आपली भूमिका स्पष्ट मांडताना अजित पवार हे दिसले आहेत.अजित पवार पुढे म्हणाले, भेटले की, मला पांडुरंगाची मूर्ती द्यायची मोठी मोठी गुच्छ द्यायची आणि चुकीचे वागायचं हे सोडून द्या. मी आलो म्हणून मोठी हार दयायचे, पण मी काय सांगितले तेही लक्षात ठेवा. चांगले वागा मी तुमच्या पाठीशी आहे. अजित पवार यांच्यासोबत यावेळी धनंजय मुंडे हे देखील दिसले. पालकमंत्रिपदाची सूत्रे आपल्या हाती घेतल्यानंतर ते पहिल्यांदाच बीडमध्ये आहेत. जिल्हा नियोजन समितीची आज बैठक आहे.या बैठकीला काही वेळातच सुरूवात होईल. पंकजा मुंडे या देखील या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर धनंजय मुंडे यांच्याऐवजी अजित पवार यांनी पुण्यासह बीडच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारली. सतत धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी ही आमदार सुरेश धस आणि संदीप क्षीरसागर यांच्याकडून केली जातंय. अंजली दमानिया यांनीही धनंजय मुंडेंवर काही आरोप केले आहेत.

## मोहम्मद सिराजला कोणत्या अभिनेत्रीने केलं क्लीनबोल्ड, बिग बॉसनंतर या सुंदरीच्या प्रेमात घायाळ....

**नवी दिल्ली :** भारताचा वेगवान गोलंदाज असलेला मोहम्मद सिराजला कोणत्या अभिनेत्रीने क्लीन बोल्ड केले आहे, हे आता समोर आले आहे. कारण मोहम्मद सिराज आणि हिंदी अभिनेत्रीच्या डेटिंगची जोरदार चर्चा आता समोर आली आहे. काही दिवसांपूर्वी आशा भोसले यांची नात असलेल्या जनाईबरोबर मोहम्मद सिराजचे फोटो व्हायरल झाले होते. जनाईच्या वाढदिवसाला मोहम्मद सिराज उपस्थित राहीला होता. त्यावेळी जनाई आणि सिराज यांचे फोटो व्हायरल झाले होते. जनाई भोसले आणि मोहम्मद सिराज यांचे फोटो व्हायरल झाले आणि त्यानंतर या दोघांचे अफेअर सुरु असल्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. त्यानंतर जनाईने माझे मोहम्मद सिराजबरोबर अफेअर नसल्याचे स्पष्ट केले होते.मोहम्मद सिराज आता कोणत्या अभिनेत्रीने क्लीन बोल्ड केले आहे, याची माहिती समोर आली आहे. मोहम्मद सिराजने या अभिनेत्रीच्या पोस्टला लाइक केले आणि त्यानंतर या दोघांच्या डेटिंगची चर्चा जोरदार सुरु झाली आहे. या अभिनेत्रीने बिग बॉस चांगलेच गाजवले होते. त्यानंतर आता तिचे नाव हे मोहम्मद सिराजबरोबर जोडले जात आहे. ही बिग बॉसमध्ये चमकलेली अभिनेत्री आहे ती माहिरा शर्मा. यापूर्वी माहिराने बिग बॉसचा १३ वा हंगाम चांगलाच गाजवला होता. त्यावेळी ती प्रसिद्धेच्या शिखरावर होती. पण त्यानंतर गेल्या काही दिवसांत ती जास्त प्रकाश झोतात आली नव्हती. पण आता मात्र सिराजबरोबर तिचे नाव जोडले गेल्याचे समोर आले आहे.मोहम्मद सिराजही सध्याच्या घडीला प्रकाशझोतात नाही. पण आता तो मैदानाबाहेर चांगलाच प्रकाशझोतात आला आहे. काही दिवसांपूर्वी सिराजच्या



एका अफेअरची चर्चा सुरु झाली होती. पण याबाबत मोहम्मद सिराज किंवा माहिरी या दोघांनी काहीच सांगितलेले नाही. त्यामुळे हे दोघे आपल्या या नात्याबद्दल काय म्हणतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

# २३ वर्षीय रशियन तरुणीसोबत भररस्त्यात

# भयंकर प्रकार, कोकणात खळबळ




**सिंधुदुर्ग :** कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा आहे याच जिल्ह्याला लागून असलेल्या गोवा राज्यात आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा वावर असतो आता गोव्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय पर्यटक येऊ लागले आहेत. याप्रमाणेच एक रशियन तरुणी ही सिंधुदुर्ग जिल्ह्यात आपल्या मित्र-मैत्रिणींसह पर्यटनासाठी आली आहे. शिक्षण घेत असलेल्या या युवतीचा सिंधुदुर्ग जिल्ह्यात वेंगुर्ले तालुक्यात एका रशियन युवतीचा विनयभंग करण्यात आला की मोठी धक्कादायक घटना घडली आहे. या सगळ्या घटनेची पोलीस प्रशासनाने गंभीर दखल घेत स्थानिक तरुणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत युवतीने दिलेल्या फिर्यादीनुसार संबंधित युवकाविरोधात वेंगुर्ले पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वेंगुर्ले तालुक्यातील एका गावातील रहिवासी असलेल्या ४० वर्षीय युवकाने रेडी येथे एका पर्यटक रशियन युवतीचा विनयभंग केला. ही घटना मंगळवार, २८ जानेवारी रोजी दुपारी १२.४० वा.च्या सुमारास वेंगुर्ले तालुक्यातील रेडी-हुडा येथे घडली. २३ वर्षीय रशियन युवतीने ही तक्रार वेंगुर्ले पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. ती कॉलेज विद्यार्थिनी असून, मार्केटिंग आणि टुरिझम या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. सध्या ती आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत भारतात पर्यटनासाठी आली आहे. मंगळवारी ते सर्वजण गोवा येथून शिरोडा वेळागर किनाऱ्यावर आले होते. दुपारी ते पुन्हा गोवा येथे परतत होते. दरम्यान, रेडी- हुडा येथे एका मित्रांची गाडी स्लिप झाल्याने संबंधित रशियन युवती रस्त्यावर थांबली होती. त्यावेळी संशयित युवकाने तिच्या अंगाला स्पर्श करून मनास लज्जा उत्पन्न होईल, असे वर्तन केले. याबाबत तिने वेंगुर्ले पोलिसात तक्रार दाखल केली आहे. युवतीने दिलेल्या फिर्यादीनुसार संबंधित युवकाविरोधात पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश राठोड तपास करत आहेत. दरम्यान, या धक्कादायक घटनेमुळे पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला आहे. अतिथी देवो भव: संस्कृती असणार भारतात असा प्रकार घडल्याने देशाचं नाव विदेशी पर्यटकांना भारत सुरक्षित वाटणार नाही. याकडे संबंधित व्यवस्थेने लक्ष द्यायला हवं.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महाकुंभ मेळ्यात मौनी अमावास्येनिमित्त प्रवीण तरडेने सपत्नीक केले अमृत स्नान!




**मुंबई-** सध्या प्रयागराज येथे महाकुंभ मेळावा चालू आहे. यंदाचा हा कुंभमेळा आणखी खास आहे कारण तो तब्बल १४४ वर्षांनी आलाय. त्यामुळे केवळ देशातच नव्हे तर देशाविदेशातील सर्वसामान्यांपासून ते मोठमोठ्या नामांकित व्यक्ती सुद्धा भारतात दाखल झाल्या आहेत. महा कुंभमेळ्यामध्ये वेगवेगळे अघोरी आणि नागा साधू बाबा यांचे महिन्याभरापूर्वीच प्रयागराज येथे आगमन झाले होते. या बाबांचे फोटो सध्या सोशल मीडियावर बरेच व्हायरल होताना पाहायला मिळत आहेत. याशिवाय अनेक सेलिब्रिटी मंडळींनी सुद्धा या ठिकाणी जाऊन पवित्र स्नान केले. आता मराठीतला डॅशिंग अभिनेता अशी ओळख असलेला प्रवीण तरडे सुद्धा तिथे गेले आहेत. प्रवीण यांनी सपत्नीक कुंभमेळ्याला हजेरी लावली. या दोघांचे त्रिवेणी संगम येथे स्नान करतानाचे फोटो आणि व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहेत. एका व्हिडिओमध्ये प्रवीण तरडे म्हणत आहेत की, मी आहे त्रिवेणी संगमावरती, सगळ्यात शुभमुहूर्तावर मी अमृत स्नान करायला आलो आहे. जर तुम्ही पाहत असाल तर संपूर्ण परिसर मुक्काम पोस्ट प्रयागराज झाला आहे. हे सर्व पाहून या त्रिवेणी संगमावर मला आठवलं ते म्हणजे आपलं मुक्काम पोस्ट देवाचं घर. मुक्काम पोस्ट देवाचं घर हा माझ्या सगळ्यात जवळच्या मित्राने बनवलेला सिनेमा येत्या ३१ जानेवारीला सिनेमागृहात प्रदर्शित होत आहे. मंगेश देसाई, सचिन नारकर , संकेत माने या पवित्र भूमीवरून तुमच्या सिनेमाला मनःपूर्वक शुभेच्छा कारण तो सुद्धा या गंगा यमुने सारखाच पवित्र आणि निर्मळ आहे. महाकुंभ मेळ्यातल्या अशा पवित्र स्नानाच्या दिवशी मी प्रार्थना करतो की, आपला लाडका मुक्काम पोस्ट देवाचं घर हा सिनेमा महाराष्ट्रात अगदी धुमधडाक्यात होऊ दे. जय श्रीराम.... याशिवाय प्रवीण तरडे यांची पत्नी अभिनेत्री स्नेहल तरडे यांनी सुद्धा स्वतःच्या इंस्टाग्राम वर प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात सहभागी झाल्यावर महा स्नान करतानाचा व्हिडिओ शेअर केलाय. या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये तिने अनुभव... त्रिवेणी संगम स्नान, २९ जानेवारी २०२५ , मौनी अमावस्या, महा कुंभ २०२५ , प्रयागराज, उत्तर प्रदेश असे लिहिले आहे. त्यांच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी कमेंट करून आनंद व्यक्त केलाय आणि त्यांचे कौतुक सुद्धा केले आहे.

महाकुंभमेळा हा जानेवारी १३ रोजी सुरू झाला. तो २६ फेब्रुवारी पर्यंत असेल. मौनी अमावस्या निमित्त प्रयागराज या ठिकाणी भरपूर भाविकांची गर्दी झाली आहे.

# पुरुषांनाही होतो मेनोपॉज, वय वाढलं की दिसतात ही भयंकर लक्षणं, करा हे ५ उपाय, वयाच्या ५० नंतरही रहाल फिट व तरुण

रजोनिवृत्ती हा शब्द ऐकला की तो सर्वसामान्यपणे महिलांशी जोडला जातो. मात्र, पुरुषांमध्येही वयोमानानुसार हार्मोनल बदल होतात, ज्याला अँड्रोपॉज म्हटलं जातं. वयानुसार शरीरातील टेस्टोस्टेरॉन या पुरुष हार्मोनचं प्रमाण कमी होऊ लागतं, ज्याचा परिणाम शारीरिक, मानसिक आणि लैंगिक आरोग्यावर होतो. हे बदल सामान्यतः ४०-५० वयानंतर दिसून येतात आणि यामुळे पुरुषांच्या जीवनशैलीत लक्षणीय बदल होऊ शकतात. अँड्रोपॉज हा एक नैसर्गिक टप्पा आहे, परंतु त्याबद्दलची जागरूकता फारशी नसल्यामुळे यासोबत येणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष केलं जातं. हा टप्पा पुरुषांसाठी तितकाच संवेदनशील ठरतो, जितका महिलांसाठी रजोनिवृत्ती! त्यामुळे अँड्रोपॉज आणि त्यासोबत येणारे हार्मोनल बदल समजून घेणं आवश्यक आहे.






### अँड्रोपॉज म्हणजे काय?

अँड्रोपॉज म्हणजे पुरुषांमध्ये टेस्टोस्टेरॉन हार्मोनचं प्रमाण कमी होण्याची प्रक्रिया. टेस्टोस्टेरॉन पुरुषांच्या शरीरातील हाडांची घनता, स्नायूंची ताकद, लैंगिक क्षमता आणि मूड यावर परिणाम करतं. ४०-५० च्या दशकात पुरुषांच्या शरीरात या हार्मोनचं प्रमाण दरवर्षी १-२% ने घटतं. हा बदल हळूहळू होतो, त्यामुळे याची लक्षणं लगेच स्पष्ट दिसत नाहीत.

### अँड्रोपॉजची सामान्य लक्षणं

शारीरिक लक्षणं : थकवा, स्नायूंमध्ये कमजोरी, पोटाची चरबी वाढणं, हाडं कमजोर होणं.
मानसिक लक्षणं : डिप्रेशन, चिडचिड, उत्साह कमी होणं, झोपेचे विकार.
लैंगिक लक्षणं : लैंगिक इच्छाशक्ती कमी होणं, इरेक्टाइल डिसफंक्शन.या लक्षणांमुळे पुरुषांच्या आत्मविश्वासावर परिणाम होतो आणि दैनंदिन जीवनात अडचणी येऊ शकतात.

### हार्मोनल बदल आणि त्याचा परिणाम

टेस्टोस्टेरॉन कमी झाल्यामुळे शरीराची चयापचय प्रक्रिया मंदावते. हृदयविकाराचा धोका वाढतो कारण टेस्टोस्टेरॉन हृदयाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचं असतं. मेंदूच्या न्यूरोट्रांसमिटरवर परिणाम झाल्यामुळे मानसिक स्वास्थ्य बिघडतं. यामुळे वजन वाढणं, टाईप २ डायबेटिस होण्याची शक्यता आणि त्वचेसाठी नैसर्गिक कोलॅजेनची कमतरता होऊ शकते

### अँड्रोपॉजवर उपाय

व्यायाम : नियमित व्यायामामुळे हार्मोनल संतुलन राखता येतं.
आहार : प्रोटीन, ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स, फळं, भाज्या आणि अँटीऑक्सिडंट्सचा समावेश असलेला संतुलित आहार.
तणाव व्यवस्थापन : ध्यान, योगा आणि पुरेशी झोप ही मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात.
उपचार : टेस्टोस्टेरॉन रिप्लेसमेंट थेरपीचा पर्याय डॉक्टरांच्या सल्ल्याने निवडता येतो.

### अँड्रोपॉजबद्दल जागरूकतेची गरज

अँड्रोपॉज ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे आणि त्याला योग्य दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. समाजात पुरुषांना आपली समस्या व्यक्त करण्यासाठी आणि योग्य मदत घेण्यासाठी प्रोत्साहित करणं महत्त्वाचं आहे. योग्य माहिती आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने या टप्प्यातून सहजतेने पुढे जाता येतं.

अँड्रोपॉज ही पुरुषांसाठी नवी सुरुवात ठरू शकते, जर त्याची व्यवस्थित काळजी घेतली गेली तर! हार्मोनल बदल स्वाभाविक असले तरी याकडे दुर्लक्ष न करता योग्य उपचार घेतल्यास, आरोग्य आणि जीवनशैली सुधारता येते. त्यामुळे अँड्रोपॉजशी संबंधित समस्यांबाबत जागरूक रहा आणि सक्रियपणे त्यावर उपाय करा.

# केस धुताना शॅम्पूत मिसळा हा एक जादुई पदार्थ





हिवाळ्यात केस गळती ही खूपच सामान्य समस्या बनते. थंड हवामानामुळे टाळू कोरडी होते, ज्यामुळे केस कमजोर होतात आणि तुटू लागतात. केसांची नैसर्गिक आर्द्रता कमी होणे, पोषणाची कमतरता, कोंडा आणि अनियमित देखभाल यामुळेही ही समस्या अधिक वाढते. बाजारातील विविध उत्पादने वापरूनही अनेकांना केस गळतीवर पूर्णतः नियंत्रण मिळवता येत नाही. यावर एक सोपा, घरगुती उपाय म्हणजे तुरटीचा वापर. तुरटीमध्ये नैसर्गिक अँटी-बॅक्टेरियल आणि टाळू शुद्ध करणारे गुणधर्म असतात. त्यामुळे केसगळती कमी होण्यास मदत होते, कोंडा दूर होतो, आणि टाळू निरोगी राहते. हिवाळ्यात केसांची विशेष काळजी घेण्यासाठी तुरटीचं पाणी अत्यंत प्रभावी ठरतं. या लेखात तुरटीचा वापर कसा करावा, त्याचे फायदे, आणि केसांसाठी त्याचे फायदे याची सविस्तर माहिती दिली आहे.

**तुरटीच्या पाण्याने केस धुण्याची पद्धत :** हिवाळ्यात केस आणि टाळू निरोगी ठेवण्यासाठी आठवड्यातून दोन ते तीन वेळा तुरटीच्या पाण्याचा वापर करावा. यामुळे केसांना पोषण मिळतं, तसेच गळती कमी होते. एका मोठ्या भांड्यात एक लिटर पाणी घ्या.,त्यात एक चमचा तुरटी पावडर टाका आणि चांगले मिसळा.,यामध्ये अर्ध्या लिंबाचा रस आणि ३-४ चमचे कडुलिंबाच्या पानांची पेस्ट मिसळा.,केसांना चांगला पोत मिळवण्यासाठी यात २ चमचे कॉफी पावडर घाला. शेवटी, या मिश्रणात अर्धा चमचा शॅम्पू घालून तयार मिश्रण वापरा. केस धुण्यासाठी हे मिश्रण वापरल्यास केस मजबूत होतात, चमक येते, आणि गळती आटोक्यात येते.

**तुरटीच्या पाण्याने मसाज कसा करावा?** :तुरटीच्या पाण्याचा मसाज करणे टाळूच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरतं. तुरटीचं तयार मिश्रण डोक्यावर हलक्या हाताने लावा आणि टाळूला ५-१० मिनिटं मसाज करा. मसाज केल्यामुळे रक्ताभिसरण सुधारतं, ज्यामुळे टाळूला पोषण मिळतं आणि केस गळती कमी होते. नंतर त्याच मिश्रणाने केसांना हलक्या हाताने मसाज करा. हे मिश्रण केसांवर काही वेळ ठेवल्यानंतर कोमट पाण्याने स्वच्छ करा. मसाज करण्याच्या या पद्धतीमुळे टाळूतील मुळांपर्यंत पोषण पोहोचतं आणि केस निरोगी होतात.

# लंडनमध्ये शिक्षण घेताना इस्त्रायलमधून आलेलं फळ पाहिलं...

# भारतात येत सुरू केली शेती, वर्षाला १ कोटी कमाई

एका तरुणाने ब्रिटनमध्ये उच्च शिक्षण घेतलं, त्यानंतर त्याने भारतात परत येत शेती सुरू केली. त्याने एका वेगळ्या प्रकारच्या शेतीतून मोठी कमाई केली आहे. लंडनमध्ये तो चं शिक्षण घेत होता. शिक्षण घेत असताना त्याला तेथील शेतीच्या पद्धतीत आवड निर्माण झाली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्याने भारतात येत स्वत:ची कंपनी सुरू केली. आज तरुण शेतीतून कोट्यवधींचं उत्पन्न घेत आहे. भोपाळमध्ये राहणाऱ्या हर्षित गोधाने लंडनमध्ये बीबीएचं शिक्षण घेतलं. इथे शिकताना त्याने इस्त्रायलमधून आयत झालेल्या ॲवोकाडो या फळाचं पॅकेट पाहिलं होतं. ते पॅकेट पाहून त्याला इस्त्रायल शेतीविषयी उत्सुकता निर्माण झाली.

लंडनमध्ये शिकलेल्या तरुणाने सुरू केली शेती हर्षित गोधा याने लंडनमध्ये शिक्षण पूर्ण केल्यानंतर इंटर्नशिप सुरू केली. मात्र लंडनमध्ये इस्त्रायलमधून फळ आलं ही बाब त्याला अतिशय खास वाटली. त्यानंतर त्याच्या मनात शेतीची माहिती घेण्याचा विचार आला. त्यानंतर तो इंटर्नशिप अर्धवट सोडून इस्त्रायलला गेला. तिथे त्याने इस्त्रायली शेतकऱ्यांकडून तेथील शेती करण्याचं तंत्र, काही माहिती घेतली. तेथील शेतकऱ्यांकडून इस्त्रायल पद्धतीची शेती शिकून आल्यानंतर त्याने २०१९ मध्ये भोपाळमध्ये इंडो इस्त्रायल ॲवोकाडो नावाची कंपनी सुरू केली आहे. आज तो ॲवोकाडोच्या शेतीतून कोटींची कमाई करतो आहे.

पाच एकर जमीनवर, ॲवोकाडोची १८०० रोपं लावली हर्षित गोधाने लंडनमध्ये शिक्षण घेतल्यानंतर इस्त्रायल शेतकऱ्यांकडून शेतीचं प्रशिक्षण घेतलं. त्यानंतर त्याने भोपाळमध्ये आपल्या घरी परत येत ॲवोकाडो या विदेशी फळाची शेती सुरू केली. भोपाळमध्ये पाच एकर जमीनीवर त्याने १८०० ॲवोकाडोची रोपं लावली. इस्त्रायलमधून मागवलेली २० हजार रोपं



५ एकरात ॲवोकाडोच्या शेतीसाठी त्याने मोठी गुंतवणूक केली. मात्र कोरोना आणि इतर काही कारणांमुळे त्याला इस्त्रायली रोपांची आयात २०२१ मध्ये करता आली. त्याने इस्त्रायलमधून २० हजार रोपं मागवली होती. आता त्या रोपांना फळं लागली असून हर्षित त्यातून मोठं उत्पन्न घेत आहे. आता हर्षित इतर शेतकऱ्यांना ही रोपं विकतो आणि त्यांना मोफत मार्गदर्शनही करतो. हर्षितने महाराष्ट्र, मध्य प्रदेश, अरुणाचल प्रदेश आणि सिक्किममध्ये रोपांची विक्री केली आहे. हर्षित लंडनमध्ये शिकत असताना त्याने इस्त्रायलमधून आलेली ॲवोकाडो फळाची पॅकेट पाहिली होती. जर लंडनमध्ये इस्त्रायलमधून ॲवोकाडो येत असेल तर ते खास आहे, काही विशेष असल्याचं त्याला वाटलं. म्हणून त्याने इस्त्रायलला जाऊन तेथील शेतीची पद्धत शिकून घेतली. नंतर भारतात येत त्याने इस्त्रायल पद्धतीने स्वस्त दरात ॲवोकाडो पीक घेण्याचा निर्णय घेतला.

**वर्षाला होते कोटींची कमाई**

ॲवोकाडो रोपांच्या विक्रीतून हर्षित वर्षाला १ कोटींची कमाई करतो आहे. त्याला त्याची ॲवोकाडोची ५ एकरातील शेती आता मोठी करायची आहे. भोपाळमध्ये वकीलांच्या कुटुंबातील एका तरुणाने कुटुंबाचा पारंपरिक व्यवसाय सोडून स्वत:चा वेगळा व्यवसाय सुरू केला. स्वत:च्या शेतीतून व्यवसाय सुरू करुन त्यातून मोठं यश मिळवलं, पैसा मिळवला. हर्षितच्या या यशस्वी व्यवसायाचं सर्वत्र कौतुक होत आहे.

# जबरदस्त! पठ्ठ्यानं एकदाच गुंतवणूक केली अन् महिन्याला लाखो रुपयांची कमाई सुरू झाली...




**पाटणा :** देशात अनेक तरुण सुशिक्षित असून त्यांनी उच्च शिक्षणही घेतले आहे. त्यातील बहुतांश तरुणांचा विचार हा फक्त सरकारी नोकरी करण्याचा असतो. परंतु योग्य यश न मिळाल्याने ते तरुण वेगळं काहीतरी प्रयोग करण्याची आशा उराशी बाळगत असतात. आजही अनेक तरुण स्वत:चा स्टार्टअप/व्यवसाय सुरू करून आणि चांगली कमाई करून चांगले जीवन जगत आहेत. बिहारमधील असाच एक शेतकरी आधुनिक शेती करत महिन्याला लाखो रुपयांची कमाई करत आहे. अरुण कुमार असं या शेतकऱ्याचे नाव असून ते बिहारच्या सीतामढी जिल्ह्यातील भासर गावातील रहिवाशी आहेत. ते आपल्या शेतात भाजीपाला पिकवून महिन्याकाठी लाखो रुपयांचे उत्पन्न घेत आहेत. अरुण यांनी दिलेल्या माहितीनुसार ते प्रत्येक हंगामानुसार भाजीपाल्याची लागवड करत असतात. भोपळा, कारले, वांगी, काकडी, बीटरूट, शिमला मिरची आणि इतर भाज्या त्यांच्या शेतात पिकवल्या जातात. अरुण यांनी सध्या शेतात भोपळा आणि कारल्याची लागवड केली आहे. दोन्ही भाज्या प्रत्येकी एक एकरात आहेत. दोन्ही भाज्यांचे उत्पादन चांगले असल्यामुळे आणि बाजारभाव चांगले असल्यामुळे भाज्यांच्या विक्रीतून दररोज पाच ते आठ हजार रुपये नफा होत असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

**दहा मजुरांना मिळतोय रोजगार**

अरुण हे आपल्या भाजीपाला शेतीतून दहा मजुरांना रोजगार देत आहेत. परदेशात जाऊन मोलमजुरी करण्यापेक्षा भाजीपाला शेती करून आनंदी राहणे चांगले. त्यामुळेच आम्ही इतरांना परदेशात न जाता घरी भाजीपाला पिकवण्याचा सल्ला देत आहोत. स्थानिक पातळीवर बेरोजगार/मजुरांना काम न मिळाल्यास त्यांनी त्यांच्या जागेवर येऊन आठ तास ड्युटी करावी, त्याला दरमहा १०,००० रुपये मानधन देण्यात येईल, असे अरुण यांनी म्हटले आहे. दुकानदार शेतातूनच भाजीपाला खरेदी करतात भाजी विक्रेते स्वत: शेतातून भाजी खरेदी करतात. विशेष म्हणजे अरुण हे आपल्या शेतातील भाज्यांमध्ये सेंद्रिय खतांचा वापर करतात. कोणत्याही भाजीपाला वनस्पतीमध्ये रासायनिक खतांचा वापर करू नये. शेतकऱ्यांनी भाजीपाला लागवडीत केवळ सेंद्रिय खतांचाच वापर करावा, असे आवाहन देखील केले आहे.

# चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारतासाठी आली गुड न्यूज, मोहम्मद शमीनंतर अजून एक खेळाडू ठरला फिट

**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफीला सुरवात होण्यापूर्वी आता भारतीय संघासाठी एक आनंदाची बातमी आली आहे. कारण मोहम्मद शमीनंतर आता भारताचा अजून एक खेळाडू फिट ठरल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आता हा मॅचविनर खेळाडू चॅम्पियन्स ट्रॉफी खेळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. तीन खेळाडूंची फिटनेस नसताही संघात केली होती एंट्री... चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा ही फेब्रुवारीमध्ये सुरु होणार आहे. पण त्यापूर्वी भारताला त्यांचा संघ जाहीर करायचा होता. त्यावेळी भारतीय संघात अशा तीन खेळाडूंची निवड केली होती, जे फिट नव्हते. पण बीसीसीआयला विश्वास होता की, ते फिट होऊ शकतील. बीसीसीआने या तिन्ही खेळाडूंपुढे एक महत्वाची अट ठेवली होती. ही अट म्हणजे भारताचा संघ जेव्हा चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी दुबईसाठी रवाना होईल, त्यापूर्वी या खेळाडूंना आपला फॉर्म आणि फिटनेस सिद्ध करावा लागेल. यामधील मोहम्मद शमीने आपला फिटनेस यापूर्वीच सिद्ध केला होता. आता भारतीय संघाकडून खेळताना त्याने आपला फॉर्मही दाखवला आहे. भारताच्या दोन खेळाडूंची चिंता अजूनही भारतीय चाहत्यांना होती. हे दोन खेळाडू होते ते जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादव. या दोघांनाही दुखापत झाली होती. त्यामुळे हे दोन्ही खेळाडू फिटनेस सिद्ध करू शकले नव्हते. पण आता दोघांपैकी एकाने आपला फिटनेस सिद्ध केला आहे आणि तो खेळाडू आहे कुलदीप यादव. कुलदीपला आता राष्ट्रीय क्रिकेट अकादमीने फिटनेसबाबत हिरवा कंदील दिला आहे, कारण त्याने फिटनेस टेस्ट पास केली आहे. त्यानंतर आता कुलदीप यादव बीसीसीआयच्या रणजी ट्रॉफी स्पर्धेत खेळून आपला फॉर्मही दाखवणार असल्याचे आता समोर येत आहे चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी आता भारताचे तीनपैकी दोन खेळाडू फिट ठरले आहेत. पण आता चाहत्यांना उत्सुकता असेल ती म्हणजे जसप्रीत बुमराह कधी फिट ठरणार आहे. कारण जसप्रीत बुमराह हा जगातील अव्वल गोलंदाज आहे, जो एकहाती सामना फिरवू शकतो. त्यामुळे त्याच्या फिटनेसच्या बातम्यांवर आता सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

# आधी सावळ्या दिसणाऱ्या अभिनेत्री अचानक गोऱ्या कशा झाल्या?

## कंगनाचा सवाल अन् मोनालिसाचं कौतुक





**मुंबई-** कंगना रणौत तिच्या स्पष्टवक्त्या विधानांसाठी देखील ओळखली जाते. ती जवळजवळ प्रत्येक मुद्द्यावर तिचे मत निश्चितच व्यक्त करते. अलिकडेच तिने ग्लॅमरच्या जगात गोऱ्या त्वचेला महत्व देण्याबाबत खोचक विधान केले आहे. तिने महाकुंभ मेळ्यात व्हायरल झालेल्या मोनालिसाचा फोटोही शेअर केला आहे.

कंगना रणौतने इंस्टाग्राम स्टोरीवर मोनालिसाचा फोटो शेअर करुन लिहिले, ही तरुणी मोनालिसा. तिच्या नैसर्गिक सौंदर्यामुळे ती इंटरनेट सेन्सेशन बनली आहे. तिच्या फोटो आणि मुलाखतींसाठी लोक तिला त्रास देतायत हे मला पाहवत नाही. पण मला आश्चर्य वाटतं की आपल्याकडे सावळ्या रंगाच्या इंडियन टोनवाल्या मुली प्रतिनिधित्व का करत नाही? कंगना पुढे लिहिले, लोक तरुण अभिनेत्रींवर तसेच प्रेम करतात जसे ते पूर्वी अनु अग्रवाल, काजोल, बिपाशा बसू, दीपिका किंवा राणी मुखर्जीवर करायचे? आजकालच्या सर्व अभिनेत्री गोऱ्या त्वचेच्या महिलांसारख्या पिवळ्या का दिसतात, अगदी सुरुवातीला सावळ्या रंगाच्या स्त्रियाही? लोक मोनालिसा सारखे नवीन लोकांशी का जोडले जात नाहीत? खूप जास्त लेसर आणि ग्लूटाथिओन इंजेक्शन्स?

**आर माधवनसोबत दिसणार कंगना**

अभिनेत्रीच्या चित्रपटांबद्दल बोलायचे झाले तर, कंगना शेवटची इमर्जन्सी चित्रपटात दिसली होती. तिने या चित्रपटाचे दिग्दर्शनही केले होते. बॉक्स ऑफिसवर तो फारसा चालला नसला तरी लोकांकडून तिच्या अभिनयाचे कौतुक झाले. अभिनेत्रीने खुलासा केला की, हा प्रोजेक्ट पूर्ण करण्यासाठी तिला तिचे घर गहाण ठेवावे लागले होते. चाहते तिच्या पुढच्या चित्रपटाची वाट पाहत आहेत. ती एका सायकॉलॉजिकल थ्रिलरमध्ये आर माधवनसोबत दिसणार आहे पण चित्रपटाचे नाव अद्याप घोषित झालेले नाही.

# पांडा पॅरेंटिंग म्हणजे काय? तुम्हीही करताय ही अजब गोष्ट?

# मुलांचा हट्टी व जिद्दीपणा रातोरात बदलेल, समजदार होतील




पॅरेंटिंगच्या विविध स्टाईल्समध्ये हल्ली एक नवा ट्रेंड प्रचलित होत आहे, जो आहे पांडा पेरेंटिंग. आजच्या युगात पॅरेंटिंगचे अनेक प्रकार आहेतहेलिकॉप्टर पेरेंटिंग, टायगर पेरेंटिंग, फ्री-रेन्ज पेरेंटिंग इत्यादी. पण पांडा पेरेंटिंग ही संकल्पना तुलनेत अधिक समजूतदार, मोकळी आणि संतुलित आहे. पांडा पेरेंटिंग म्हणजे मुलांना जास्त दबाव न देता, त्यांना स्वाभाविकपणे शिकण्यास आणि मोठं होण्यास संधी देणं. या पद्धतीत पालक मुलांच्या प्रत्येक गोष्टीत हस्तक्षेप करत नाहीत, उलट त्यांना स्वतंत्र निर्णय घेण्याची मोकळीक देतात. यामुळे मुलांमध्ये आत्मनिर्भरता, समस्या सोडवण्याची क्षमता आणि आत्मविश्वास निर्माण होतो. या लेखात आपण पांडा पेरेंटिंगचा अर्थ, त्याचे फायदे आणि मुलांच्या विकासावर होणारा परिणाम याबद्दल सविस्तर माहिती घेणार आहोत.

**पांडा पेरेंटिंग म्हणजे काय?**

पांडा पेरेंटिंग ही एक पॅरेंटिंगची खास स्टाईल आहे जिथे पालक आपल्या मुलांना त्यांच्या गतीने शिकू देतात आणि मोठं होऊ देतात. पांडा हा प्राणी मुळात शांत, प्रेमळ आणि संयमी असतो. याच संकल्पनेवर आधारित ही पॅरेंटिंगची पद्धत आहे. या पद्धतीत मुलांवर सतत नियंत्रण ठेवले जात नाही किंवा त्यांच्यावर अधिक कडक शिस्त लादली जात नाही. पालक मुलांना स्वतःच्या चुका करण्याची संधी देतात आणि त्यातून शिकण्यास प्रवृत्त करतात.

**मुलांमध्ये आत्मनिर्भरता आणि निर्णयक्षमतेचा विकास**

पांडा पेरेंटिंगचा सर्वात मोठा फायदा म्हणजे मुलांमध्ये आत्मनिर्भरता आणि निर्णयक्षमता निर्माण होते. जेव्हा पालक प्रत्येक छोट्या छोट्या गोष्टीत हस्तक्षेप करत नाहीत, तेव्हा मुलं स्वतः निर्णय घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांना चुकीचा किंवा योग्य निर्णय घेण्याचा अनुभव मिळतो आणि त्यामुळे त्यांची आत्मनिर्भरता वाढते. अशा प्रकारे मोठे झालेली मुलं भविष्यात अधिक जबाबदार आणि स्वतंत्र होतात.

**समस्या सोडवण्याची क्षमता वाढते**

सतत आई-वडिलांवर अवलंबून राहणाऱ्या मुलांना संकटं कशी हाताळायची हे समजत नाही. मात्र, पांडा पेरेंटिंगमध्ये पालक मुलांना योग्य मार्गदर्शन देतात, पण त्याचवेळी त्यांना समस्या स्वतः सोडवण्याची संधीही देतात. यामुळे मुलांमध्ये समंजसपणा आणि समस्या सोडवण्याची कला विकसित होते. भविष्यात अशा मुलांना कोणत्याही अडचणींवर मात करण्याची क्षमता विकसित होते.

**मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर**

आजच्या काळात अनेक मुलं अभ्यासाच्या आणि स्पर्धेच्या तणावाखाली असतात. सततच्या पालकांच्या अपेक्षा आणि सामाजिक दबावामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. मात्र, पांडा पेरेंटिंगमध्ये मुलांना त्यांच्या गतीने शिकू आणि विकसित होऊ दिलं जातं. त्यामुळे त्यांच्यावर कोणताही अनावश्यक तणाव येत नाही आणि मानसिक स्वास्थ्य सुधारते. यामुळे मुले आनंदी आणि आत्मविश्वासपूर्ण राहतात.

**पालक-मुलांमधील नातं अधिक मजबूत होते**

सतत आदेश देणारे आणि नियंत्रण ठेवणारे पालक मुलांच्या दृष्टीने कठोर वाटू शकतात. त्यामुळे पालक आणि मुलांमध्ये अंतर निर्माण होऊ शकतं. मात्र, पांडा पेरेंटिंगमध्ये संवाद आणि विश्वास याला अधिक महत्त्व दिलं जातं. पालक मुलांच्या प्रत्येक छोट्या गोष्टीत हस्तक्षेप करत नाहीत, पण जेव्हा आवश्यक असेल तेव्हा त्यांना मदत करतात. त्यामुळे पालक आणि मुलांमधील नातं अधिक विश्वासार्ह आणि प्रेमळ बनतं.

पांडा पेरेंटिंग ही मुलांना नैसर्गिकरीत्या शिकू देण्याची आणि मोठं होऊ देण्याची एक समजूतदार आणि समतोल पद्धत आहे. मुलांना योग्य निर्णय घेण्याची, समस्या सोडवण्याची आणि आत्मनिर्भर होण्याची संधी देणे हे या पद्धतीचं वैशिष्ट्य आहे. त्यामुळे मुलांचं मानसिक आरोग्य सुधारतं, त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि पालक-मुलांचं नातं अधिक मजबूत होतं. तुम्हीही तुमच्या मुलांच्या समतोल वाढीसाठी पांडा पेरेंटिंगचा अवलंब करण्याचा विचार करू शकता.

## डी.ई.एस हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज च्या विद्यार्थ्याने बनवला स्मार्ट अ‍ॅग्री रोबोट

**जनसंचलन/मलकापुर**

डी. ई. एस. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, दाताळा (ता. मलकापूर, जि. बुलढाणा) येथील विद्यार्थी यज्ञेश पद्माकर झोपे याने आपली विज्ञानातील चमकदार कल्पकता सिद्ध केली! तो श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित ५२ व्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनीत सहभाग घेत आपल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाचे सादरीकरण केले. शेतातील सर्व कामे स्वयंचलितरीत्या करणारा डेडिकेटेड रोबोट, जो रिमोट कंट्रोल एक्सेस आणि रिमोट व्हूइंग ऑप्शन सह कार्य करतो. आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज, हा रोबोट शेती



अधिक स्मार्ट आणि कार्यक्षम बनवतो! या उल्लेखनीय प्रवासात मार्गदर्शक शिक्षक श्री व्ही. पी. नारखेडे यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले.

## पालक सभा आणि कॉपी मुक्त अभियान २०२५ साठी विशेष सभा आयोजित



**जनसंचलन/ बुलढाणा**

जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा येथे पालक सभा आणि कॉपी मुक्त अभियान २०२५ अंतर्गत विशेष सभा आयोजित करण्यात आली. या सभेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिक शिक्षणाची आवड निर्माण करणे आणि पालकांच्या सक्रिय सहकार्याद्वारे सकारात्मक बदल घडविणे हा होता. सभेची सुरुवात प्राचार्य डॉ. सुरेश एन. गवई यांच्या अध्यक्षतेखाली दिपप्रज्वलनाने झाली. कनिष्ठ विभाग प्रमुख श्री. एस.एस. माने सर यांनी सभेचे प्रास्ताविक केले. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिक शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि पालकांना त्यांच्या मुलांच्या प्रगतीत योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या श्रीमती शकुंतला ताई सोनूने (आजीव सदस्य, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती), शाळा समिती सदस्य श्री. व्हि.टी. देशमुख सर आणि श्रीमती इंदूमती ताई लहाणे उपस्थित होते. मार्गदर्शक म्हणून माजी प्राध्यापक श्री. व्हि.टी. सुरुशे सर आणि प्रा.श्री. एल. के. कंकाळ सर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. सभेदरम्यान ११वी वर्गातील भाग्यश्री ठेंग आणि १२वी वर्गातील राणी मोरे यांनी आपल्या मनोगतांमधून प्रामाणिक शिक्षणाच्या महत्वावर भाष्य केले. त्यांनी शिक्षणामध्ये मेहनत, सचोटी आणि पालक-शिक्षक सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले. पालक प्रतिनिधी म्हणून जया ताई धुरंधर यांनी शाळा व महाविद्यालयीन स्तरावर पालकांच्या सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाला प्रा. वानखेडे मॅडम, प्रा. रजनी निखाडे मॅडम, प्रा. मोरे मॅडम, प्रा. काळवाघे मॅडम, प्रा. राऊत मॅडम, प्रा. प्रणीता पाटील मॅडम, प्रा. शशीकांत चव्हाण सर, आणि प्रा. किरण राजपूत सर यांचा मोलाचा सहभाग होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सपकाळ मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. नदीम सैय्यद यांनी केले. या सभेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रामाणिक शिक्षण आणि कॉपी मुक्त शिक्षणाचे महत्त्व समजावून देण्यात आले. पालकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचा उद्देश या कार्यक्रमाने साध्य केला.

# जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा संपन्न...

**जनसंचलन/ खामगाव**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धा शारदा ज्ञानपीठ विद्यालय बुलढाणा येथे दि.२६ ते २९ जानेवारी दरम्यान आयोजन करण्यात आले होते. यावेळी विजेता खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेमध्ये १० संघानी सहभागी झाले होते. सामने साखळी बाद पध्दतीने खेळविले गेले. वयोगट १३ वर्षा आतील मुलांसाठी बुलढाणा जिल्ह्यामध्ये प्रथमच स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. स्पर्धेमध्ये एकूण २१ सामने खेळविण्यात आले. प्रत्येक सामन्यामधून उत्कृष्ठ खेळाडूंचे पारीतोषिक देण्यात आले. प्रथम चार संघाना चषक व रोख पारीतोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेमध्ये मलकापूर संघाने उत्कृष्ठ खेळाचे प्रदर्शन करीत स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. शारदा ज्ञानपीठ विद्यालयाने द्वितीय क्रमांक तर शारदा ज्ञानपीठ संघ झ्ह्वबफ्ह, बुलढाणा यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. पोदार इंटरनॅशल स्कूल, बुलढाणा यांनी चतुर्थ क्रमांक प्राप्त केला. तसेच पुर्ण स्पर्धेमधून उत्कृष्ठ गोलकिपर आरव राणे, उत्कृष्ठ डिफेन्डर गगन जाजू, उत्कृष्ठ मीड फिल्डर सोहम जावरे, उत्कृष्ठ फॉर्वड रुद्र गौतम व बेस्ट प्लेअर ऑफ द टुरनामेन्ट सोहम सौंडलकर यांनी वैयक्तीक पारीतोषीक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पंच म्हणून अर्जुन दांडगे, ओम बनसोडकर, प्रेम सोनुने, गजानन हिरे व ओम हिवाळे यांनी कामकाज बघितले. स्पर्धेच्या बक्षीस वितरणासाठी प्रमुख



अतिथी जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर, शारदा ज्ञानपीठचे अध्यक्ष डॉ. देशपांडे, जिल्हा फुटबॉल संघटनाचे अध्यक्ष एस.एस.ठाकरे, सरचिटणीस एन. आर.वानखेडे उपस्थित होते. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे सर्व अधिकारी, कर्मचारी व जिल्हा फुटबॉल संघटनेचे सर्व पदाधिकारी तसेच मुकेश बाफणा, डॉ जीवन मोहोड, मनोज श्रीनीवास यांनी परिश्रम घेऊन यशस्वी आयोजन केले.

# अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत शनिवारी फोस्टेक प्रशिक्षण...

## हॉटेल, केटरींग व्यवसाय चालकांनी सहभागी होण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११ ते ३ वाजेदरम्यान हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग व्यवसाय चालकांसाठी फोस्टेक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण मोफत असून मे. नर्मदा हॉटेल, चिखली रोड, बुलढाणा येथे होणार आहे. जिल्ह्यातील हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग अन्न व्यवसाय चालकांनी मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक आयुक्त प्रमोद पाटील यांनी केले आहे. फोस्टेक प्रशिक्षण हा भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचा उपक्रम असून भारत सरकार आणि अन्न सुरक्षा आयुक्त यांचे निर्दे शानुसार घेण्यात येत आहे. हॉटेल, रेस्टॉरंट, आणि केटरिंग व्यवसाय चालवण्याऱ्यांसाठी प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त असून केवळ अन्न सुरक्षा सुनिश्चित होत नाही, तर व्यावसायाची विश्वासार्हत आणि गुणवत्ता देखील वाढते. प्रशिक्षणाचा उद्देश अन्न सुरक्षा आणि स्वच्छता याबाबत जागरुकता निर्माण करणे व अन्न व्यावसाय चालकांना योग्य प्रशिक्षण देणे हा आहे. फोस्टेक प्रशिक्षणामुळे अन्न सुरक्षा मानकांचे योग्य पालन करणे सोपे होते, ग्राहकांपर्यंत सुरक्षित आणि दर्जेदार अन्न पोहोचवण्यासाठी मदत मिळते. तसेच ग्राहकांना हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या सर्व नियमांचे पालन होत आहे, याची खात्री मिळते. स्वच्छता, अन्न हाताळणी, आणि आपात्कालीन स्थिती हाताळण्याबद्दल कर्मचारी अधिक जागरुक आणि प्रशिक्षित होतात. अन्न सुरक्षा मानकांचे पालन न केल्यास व्यवसायाला दंड किंवा परवाना रद्द होण्याचा धोका असतो. प्रशिक्षणामुळे हे धोके कमी होतात. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर सहभागी अन्न व्यवसाय चालकाना फोस्टेक प्रमाणपत्र दिले जाते. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या अधिकृत प्रशिक्षण भागीदारामार्फत प्रशिक्षण दिले जाणार असून सदर प्रशिक्षण पूर्णपणे मोफत आहे. प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग व्यवसायाची परवाना प्रत, व्यवसायातर्फे सहभागी होणारे मालक, शेफ, सुपरवायजर यांचे आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक, अन्न व औषध प्रशासन बुलढाणा कार्यालयात जमा करावे अथवा प्रशिक्षण संस्थेच्या मोबाइल क्रमांक ९४२०४४०२८१ वर माहिती पाठवावी.

# योग व प्राणायाम शिबिर संपन्न...

**जनसंचलन/बुलढाणा**

राजे छत्रपती कला महाविद्यालय येथे मा. आ. विजयराज शिंदे यांच्या मार्गदर्शनात व प्राचार्य डॉ.अविनाश मेश्राम यांच्या नियोजन व सूचनेनुसार शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग मार्फत योग प्राणायाम प्रात्यक्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिरामध्ये शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. कामिनी मामर्डे यांनी प्राणायाम व प्रत्याहार यांचा समतोल ठेवून गृहस्थाश्रमातील व्यक्तींना व विद्यार्थ्यांना जास्त फायदा होतो यासाठी योग प्राणायाम नियमित करावा असे मत व्यक्त केले प्रमुख अतिथी डॉ. विजय मोरे यांनी योग प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच डॉ.महादेव रिठे यांनी प्रात्यक्षिक सहित मार्गदर्शन केले कार्यक्रमांमध्ये डॉ. नितीन जाधव सर यांनी योग आणि एकाग्रता यांचा सखोल संबंध स्पष्ट करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

# नव्या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेच्या ५१९ कोटींच्या प्रारूप आराखड्यास मान्यता...

## पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्यादृष्टीने सन २०२५-२६ या नव्या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ४००.७८ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना घटक कार्यक्रमाअंतर्गत १०० कोटी व आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत १८.६५ कोटी अशा एकूण ५१९. ४३ कोटींचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला असून या प्रारुप आराखड्यास पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. निवडणुकीनंतर जिल्ह्याची पहिली जिल्हा नियोजन समितीची बैठक ही जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झाली. या बैठकीला केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, सर्वश्री आमदार चैनसुख संचेती, सिद्धार्थ खरात, श्वेता महाले, मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत सन २०२५-२६ साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत शासनाने ४००.७८ कोटी रुपये कमाल आर्थिक मर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी ९३६.२४ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. राज्यस्तरीय बैठकीत ५३५.४६ कोटी रुपये वाढीव आराखड्याची मागणी करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीने मान्यता प्रदान करण्यात आली. अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत शासनाने १०० कोटी रुपये कमाल आर्थिक मर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी रु. १६४.०२ कोटी नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. राज्यस्तरीय बैठकीत ६४.०२ कोटी रुपये वाढीव आराखड्याची मागणी करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली असून हा प्रारुप आराखडा राज्यस्तरीय समितीकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली. तसेच आदिवासी घटक कार्यक्रम अंतर्गत शासनाने १८.६५ कोटी रुपये कमाल आर्थिक मर्यादा निश्चित केली आहे. त्यानुसार अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी ३३.९० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. राज्यस्तरीय बैठकीत १५.२५ कोटी रुपये वाढीव आराखड्याची मागणी करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. चालु आर्थिक वर्षासाठी (२०२४-२५) ४४० आराखड्यास मंजुरी दिली आहे. त्यापैकी ३९४ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांसाठी राज्य शासनाकडून एकूण नियतव्ययपैकी १७६ कोटी रुपये प्राप्त झाले असून त्यापैकी १५१ कोटी रुपये (८५.८३%) निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित निधी उपलब्ध करुन मिळण्याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करणार असून तो लवकरच प्राप्त होईल. तथापि मंजूर आराखड्यातील सर्व कामे मार्च अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्दे श पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीत सन २०२४-२५ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), अनुसुचित जाती उपयोजना, आदिवासी घटक कार्यक्रमाच्या जानेवारी अखेर खर्चाचा आढावा घेण्यात



आला. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) मुळ मंजूर नियतव्यय ४४० कोटी रुपये असून त्यापैकी ३९३.३१ कोटींच्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहेत. अनुसूचित जाती उपयोजना योजनेसाठी मुळ मंजूर नियतव्यय १०० कोटी रुपये असून त्यापैकी ८१.०१ कोटींच्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहे. तसेच आदिवासी घटक कार्यक्रम योजनेसाठी मुळ मंजूर नियतव्यय १८.०९ कोटी रुपये असून त्यापैकी ६.०८ कोटींच्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असल्याची माहिती या बैठकीत देण्यात आली. तसेच या बैठकीत जिल्ह्यातील कृषी, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, रस्ते आदी क्षेत्रातील कामांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये शासकीय रुग्णालयांची सुधारणा, जिल्हा परिषद शाळांतील प्रसाधनगृह स्वच्छता, वैद्यकीय अधिकारी भरती, ट्रॉमा केअर सेंटर, मॉडेल स्कुल, मागेल त्याला सौर कृषी पंप, व्यायमशाळा, पीक विमाबाबत आमदारांनी उपस्थित केलेल्या विषयांवर बैठकीत चर्चा करण्यात आली.

## कुख्यात वाळू चोरट्याचे महसूल विभागाने सिनेस्टाईल पकडले टिप्पर

**जनसंचलन/ मलकापूर**

गेल्या अनेक दिवसापासून मलकापूर नजीक असलेल्या पूर्णा माय नदीपात्रात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक होत असल्याची माहिती महसूल विभागाला सूत्रांकडून मिळाली. या अनुषंगाने तहसीलदार राहुल तायडे यांच्या आदेशान्वये तलाठी मनोज एदलाबादकर यांनी महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यासह विना नंबर व अवैध रेतीने भरलेल्या टिप्परला सिनेस्टाईल पाठलाग करून अखेर काळेगाव-हरसोडा रोडवर धरदबोचले. पूर्णामाई नदीपात्रात महसूल प्रशासनाकडून वाळू तस्करी थांबविण्यासाठी निरंतर कारवाया सुरूच आहेत. तरीसुद्धा वाळूमाफिया प्रशासनाची नजर चुकवून अवैध वाळू उपसा व वाहतूक करीतच होते.या वाळू माफियांना दणका देण्यासाठी अधिकारीही डोळ्यात तेल घालून रात्रंदिवस टिपून होते. तहसीलदार राहुल तायडे यांना अवैध रेती वाहतूक करणारे एका विना नंबर टिप्पर ची माहिती आज दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी मिळाली. त्या अनुषंगाने सकाळपासूनच नरवेल,कोटेश्वर, हरसोडा, काळेगाव,सावरगाव या परिसरात तहसीलदार यांच्या आदेशान्वये महसूल विभागाची एक टीम कर्तव्यावर होती. मिळालेल्या माहितीप्रमाणे विना नंबर चे एक टिप्पर ज्यावर प्रथम दर्शनी भागात विठ्ठले व पाठीमागील भागात रावडी असे लिहिले होते. सदर टिप्पर चालकाने महसूल विभागाची गाडी पाहताच टिप्पर सुसाट वेगाने पळवले. पुढे सदर टिप्पर व त्या पाठीमागे महसूल विभागाची गाडी असा सिनेस्टाईल पाठलाग सुरू होता. अखेर महसूल कर्मचाऱ्यांकडून सदर टिप्पर अडविले व चालकाची चौकशी केली असता सुरुवातीला चालकाने उडवाउडवीचे उत्तर दिले व टिप्पर घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला व नंतर सदर टिप्पर मालक मुन्ना राठोड असल्याचे सांगितले. त्यानंतर महसूल कर्मचाऱ्यांनी सदर टिप्पर मलकापूर उपविभागीय कार्यालयाच्या प्रांगणात लावण्यात येऊन कारवाई, पंचनामा प्रक्रिया सुरू केली असल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. सदरची कारवाई तहसीलदार मा राहुल तायडे साहेब यांच्या आदेशान्वये तलाठी मनोज एदलाबादकर साहेब, शिपाई सचिन गिरी, काळेगावचे पोलीस पाटील, वाहन चालक दिलीप तायडे या धाडसी टीम कडून करण्यात आली आहे.

## डॉ जाकीर हुसैन उर्दु प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न...

**जनसंचलन/मेहकर**

वर्गाच्या चार भिंतीच्या आत केल्या जाणाऱ्या पेरणीतून उद्याचा समाज व राष्ट्र उभे राहत असते. विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम हे शिक्षकांचे असते. त्यामुळे विद्यार्थी ही राष्ट्राची संपत्ती असून ही संपत्ती समृद्ध करण्यासाठी शिक्षकांनी शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श विद्यार्थ्यांची संस्कारक्षम पिढी घडवावी. तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी अंजनी बु! येथिल डॉ जाकीर हुसैन उर्दु प्राथमिक शाळा प्रगतीपथावर आहे. आज या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर डॉ जाकीर हुसैन उर्दु प्राथमिक शाळेत शैक्षणिक संस्काराची जडणघडण होत आहे. त्याचं संस्काराची शिदोरी घेऊन, हा विद्यार्थी उद्या आपल्या उज्वल भविष्यासाठी आकाशी झेप घेणार आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थ्यांना घडविण्याची ताकद फक्त शिक्षकांमध्येच आहे. अशा विविध शैक्षणिक, वार्षिक स्नेहसंमेलन हा विद्यार्थ्यांसाठी आनंद सोहळा असतो. त्याद्वारे त्यांच्या आवडीनुसार कला सादर करण्याची संधी मिळते. अर्थातच अशा स्नेहसंमेलन सांस्कृतिक उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असतो. प्राथमिक शाळेत आयोजित स्नेहसंमेलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना डोणगाव अर्बन बँकेचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण बोलत होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958